साप्ताहिक
# पृथ्वी प्रतिष्ठान
pruthvipratishthan708@gmail.com
संपादक: शिवदास मारोतीराव मुंडे
PRUTHVI PRATISHTHAN

बीड | वर्ष - ०१ ले | अंक २ | शनिवार २२ ऑगस्ट २०२६ | RNI/MHMAR/26/A4676 | पान ४ | किंमत १ रू
Beed | year - ०1 st | Issue2 | Saturday,22 August 2026 | RNI/MHMAR/26/A4676 | Page 4 | Price 1 Inr

# विलास घुले हत्या प्रकरणातील तपासाचा खेळखंडोबा कधी थांबणार ?

## कुटुंबीय उपोषण करत राहिले, पोलीस प्रशासन मात्र कानात बोळे घालून बसले ?

### सीडीआरच्या आधारे पुरवणी जवा बातल्या आरोपींवर कारवाईची मागणी; सीआयडीला तपासासाठी अजून किती वेळ द्यायचा? आता अंत पाहू नका, म्हणत बीडकरांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट एल्गार!

**बीड / प्रतिनिधी :**
**केज तालुक्यातील टाकळी येथील विलास घुले हत्या प्रकरणातील आरोपींच्या अटकेसह तपासाबाबत ठोस कारवाई करण्याच्या मागणीसाठी शुक्रवारी दि. २१ ऑगस्ट रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात ज्येष्ठ विधिज्ञ गुणरत्न सदावर्ते यांच्यासह टाकळी ग्रामस्थ, घुले कुटुंबीय आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मोठी गर्दी झाली होती. विलास घुले यांच्या हत्येला बराच कालावधी उलटूनही कुटुंबीयांच्या मागण्यांकडे आणि मोबाईल सी डी आर मध्ये उघड असलेल्या आरोपीकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहिले नसल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. प्रकरणातील संशयित आरोपी, पुरवणी जबाबात नाव आलेले आरोपी तसेच खासदार पुत्र सौरभ सोनवणे यांच्या अटकेसाठी व तपासासाठी उपलब्ध पुरावे आणि सीडीआर (CDR) च्या आधारे निष्पक्ष तपास करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.**

सीडीआर तपासून सत्य बाहेर काढा!
विलास घुले प्रकरणातील तपास सीडीआरच्या (CDR) आधारे पुढे नेऊन संबंधित आरोपींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी घुले कुटुंबीयांनी केली आहे. “सीआयडीला तपासासाठी आणखी किती वेळ द्यायचा?” असा सवाल करत रमेश घुले यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायासाठी आता रस्त्यावर उतरावे लागल्याने प्रशासनाने तपासाला गती देऊन सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी मोर्चाकर्त्यांनी केली.
आता अंत पाहू नका!

### धानोरा पोलीस स्टेशन येथे पाच जणांवर गुन्हा दाखल

विलास घुले हत्या प्रकरणात आरोपींच्या अटकेसाठी कुटुंबीयांनी वारंवार उपोषणे, निवेदने आणि आंदोलने करूनही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात आला. उपलब्ध सीडीआरसह पुराव्यांच्या आधारे निष्पक्ष तपास करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी टाकळी ग्रामस्थांसह बीडकरांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढला. प्रशासनाने आता तरी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.




### तपास निष्पक्ष व्हावा, बीडकरांचे लक्ष लागले

वस्तुनिष्ठ निष्कर्षांपर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे. कोणत्याही निष्पाप व्यक्तीवर अन्याय होऊ नये आणि दोषी व्यक्ती कायद्याच्या कचाट्यातून सुटू नये, यासाठी पारदर्शक व निष्पक्ष तपास होणे गरजेचे आहे. न्याय मिळवण्यासाठी कुटुंबीयांना वारंवार आंदोलनाची भूमिका घ्यावी लागत असेल, तर प्रशासनाने या प्रकरणाकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याची भावना मोर्चात सहभागी नागरिकांनी व्यक्त केली. आता या विराट मोर्च्यानंतर प्रशासन आरोपींच्या अटकेसह तपासाबाबत कोणती ठोस आणि कायदेशीर भूमिका घेते, याकडे संपूर्ण बीडकरांचे लक्ष लागले आहे.

# बीड पोलिसांचा थरारक पाठलाग! गुन्हेगारांचा पाठलाग करून बीड पोलिसांनी आंतरजिल्हा अट्टल चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या, पांढऱ्या टाटा सुमोसह दोघे जेरबंद.

बीड:
जिल्ह्यात आंतरजिल्हा जबरी चोरी करणाऱ्या अट्टल टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पथकाने पडदाफाश केला आहे. चित्रपटाच्या कथानकालाही शोभेल अशा थरारक पाठलागानंतर पोलिसांच्या पथकाने शेतात लपलेल्या दोन अट्टल गुन्हेगारांवर मोठ्या शिताफीने झडप घातली . या कारवाईत चोरीच्या गुन्ह्यात वापरलेली पांढऱ्या रंगाची टाटा सुमो गाडी जप्त करण्यात आली असून, वडवणी पोलीस ठाण्यातील दोन गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत.
गुप्त बातमीदार अन् फिल्मी स्टाईल चेसळ--
स्थानिक गुन्हे शाखेचे पथक माजलगाव उपविभागात गस्त घालत असताना, गुप्त बातमीदाराकडून खबर मिळाली की,वडवणी पोलीस ठाण्यातील दाखल गुन्ह्यातील संशयित आरोपी मिथुन साळवे आणि रोहन केकान हे आपल्या साथीदारासह पांढऱ्या रंगाच्या टाटा सुमो गाडीने लहुळ रोडने पांगरीच्या दिशेने जात आहेत.




माहिती मिळताच पोउपनिश महेश विघ्ने आणि त्यांच्या पथकाने तत्काळ कारवाई करत संशयित गाडीचा पाठलाग सुरू केला. पोलिसांची गाडी मागून येत असल्याचे लक्षात येताच चोरट्यांनी सुसाट गाडी पळवली. पांग्रूड आणि तेलगाव शिवारात पोलिसांनी गाडीचा पाठलाग करत त्यांना घेरण्याचा प्रयत्न केला. स्वतःला अडकलेले पाहून आरोपींनी गाडी सोडून थेट शेतात पळ काढला; मात्र पोलिसांनीही कसलाही विचार न करता शेतात घुसून थरारक पाठलाग करत दोघांनाही शिताफीने पकडले.
चोरीचे दोन गुन्हे उघड; टाटा सुमो जप्त--
ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे खालील प्रमाणे आहेत,
मिथुन दादाराव साळवे (वय २५, रा. रमाई नगर, वडवणी)
रोहन कल्याण केकान (वय २५, रा. जुना मोंढा, वडवणी)
पोलिसांनी दोघांकडे कसून आणि पोलिसी खाक्या दाखवत चौकशी केली असता, त्यांनी वडवणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन मोठ्या चोऱ्यांची कबुली दिली. त्यांच्या ताब्यातून १,००,०००/- रुपये किमतीची टाटा सुमो गाडी (क्र. MH.23 E.6544) जप्त करण्यात आली आहे.
ही यशस्वी कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, आणि माजलगाव उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वात पार पडली. प्रत्यक्ष कारवाईत पोउपनिश महेश विघ्ने, पोलीस अंमलदार महेश जोगदंड, जफर पठाण, बप्पासाहेब घोडके, दिलीप गिते आणि गणेश मराडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.
पुढील कायदेशीर कारवाईसाठी दोन्ही आरोपींना व जप्त केलेल्या वाहनाला वडवणी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.
पोलिसांच्या या धडक कारवाईचे जिल्हाभरात कौतुक होत आहे.

## केज येथे पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते शार्वी मोटार्स ई बाईक शोरूमचे उद्घाटन





**केज दि १७(प्रतिनिधी)**
केज शहरात अंबाजोगाई रोड लगत एस बी आय बँकेच्या शेजारी शार्वी मोटर्सइलेक्ट्रिक बाईक शोरूमचे उद्घाटन पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, अंबासाखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर,युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या हस्ते झाले. यावेळी शिवसेना महिला जिल्हाध्यक्ष डॉ प्रतिभा अशोक थोरात, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुशराव इंगळे, नगराध्यक्ष सीताताई बनसोड, हरुणभाई इनामदार, माजी आमदार संगीता ठोंबरे, माजी सरपंच किशोर थोरात, विष्णू घुले, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे विष्णू सरवदे, उज्वल ठाकूर, सचिन नेहरकर आदींची उपस्थिती होती. ई बाईक पर्यावरण पूरक आहे. पर्यावरण संरक्षण करण्यासाठी ही काळाची गरज आहे. नागरिक याकडे वळत आहेत असे संबोधून ना पंकजाताई मुंडे यांनी शुभेच्छा दिल्या. रमेशराव आडसकर म्हणाले, युवकांनी व्यवसाय सचोटीने करायला हवा. युवकांच्या पाठीशी कायम आम्ही खंबीरपणे उभा आहोत असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक किशोर थोरात यांनी केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी शोरूमचे श्रीकांत गोविंदराव पिंपळे, सुमित विश्वनाथ ढेंबरे,गोपाळ ढेंबरे ,शिरीष पिंपळे यांनी परिश्रम घेतले. उद्घाटन समारंभास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील चमकता तारा – बिबीशन पाळवदे

किनवट तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी, त्यांच्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश पोहोचावा आणि समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणता यावे, या ध्येयाने सातत्याने कार्य करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे बिबीशन पाळवदे. शिक्षण, सामाजिक कार्य आणि सार्वजनिक जीवन या तिन्ही क्षेत्रांत आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणारे पाळवदे हे आज अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत.
किनवट तालुक्यातील उमरी, भारारी, सावरगाव, शिंगारवाडी यांसारख्या दुर्गम भागातील गोरगरीब व आदिवासी मुला-मुलींना शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी उल्लेखनीय काम केले. शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळा सुरू करणे, आवश्यक सुविधा निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, हे त्यांच्या कार्याचे प्रमुख वैशिष्ट्य राहिले आहे.
किनवट तालुक्यातील विदोबा करड शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याला सुरुवात झाली. शिक्षण क्षेत्रात काम करताना त्यांनी केवळ स्वतःच्या प्रगतीचा विचार न करता, परिसरातील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले.
त्यांच्या कार्याचा प्रवास अत्यंत संघर्षमय राहिला. शिक्षण क्षेत्रात कार्यरत असताना अनेक अडचणींचा सामना करूनही त्यांनी ध्येयापासून कधीही माघार घेतली नाही. शाळांच्या माध्यमातून ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. आज या प्रयत्नांचे फलित अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत पुढे जाताना दिसत आहे.
सन १९९८ मध्ये त्यांच्या शैक्षणिक कार्याला नवी दिशा मिळाली. विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षकांचा विश्वास संपादन करून त्यांनी शैक्षणिक संस्था उभ्या करण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले. पुढे शासनाकडून शाळांना मान्यता मिळवून देण्यापासून ते शाळांच्या विकासासाठी आवश्यक सोयी-सुविधा निर्माण करण्यापर्यंत त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.
सावरगाव तांडा आणि शिंगारवाडी परिसरातील विद्यार्थ्यांसाठी शाळा सुरू करून त्यांनी शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. विशेषतः आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलांना शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार आजही उल्लेखनीय मानला जातो.
शाळांच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम त्यांच्या संस्थेने केले आहे.
त्यांच्या कार्याचा विस्तार केवळ शाळांपुरता मर्यादित राहिला नाही. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांना हातभार लावला. समाजातील गरजू घटकांना मदत करणे, युवकांना योग्य दिशा देणे आणि परिसराच्या विकासासाठी सकारात्मक भूमिका घेणे, हा त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा भाग राहिला आहे.शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबरोबरच त्यांनी अध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रातही काम केले. सावरगाव तांडा येथे संत भगवान बाबा माध्यमिक विद्यालय तसेच मातोश्री पावती पाळवदे माध्यमिक विद्यालय यांसारख्या शैक्षणिक उपक्रमांना त्यांनी चालना दिली. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या गावाजवळच शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी, हा या प्रयत्नामागील प्रमुख उद्देश होता.
किनवट तालुक्यातील त्यांच्या कार्याची दखल घेत विविध सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले आहे.
शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, या विचारातून त्यांनी आपला कार्यप्रवास पुढे नेला.
पाळवदे यांच्या कार्यातून एक बाब प्रकर्षाने जाणवते—संकल्प, सातत्य आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी यांची सांगड घातली तर दुर्गम भागातही परिवर्तनाची नवी वाट निर्माण करता येते. स्वतःच्या वाट्याला आलेल्या अडचणींना न जुमानता त्यांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार केला. त्यामुळेच त्यांच्या कार्याकडे केवळ शैक्षणिक संस्थाचालक म्हणून नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत योगदान देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून पाहिले जाते.
आज किनवट तालुक्यातील दुर्गम भागात शिक्षणाचा विस्तार होत असताना त्यामागे अनेक कार्यकर्त्यांचे योगदान आहे. त्यामध्ये बिबीशन पाळवदे यांचे नाव निश्चितच आदराने घेतले जाते. शैक्षणिक क्षेत्राला सामाजिक जाणिवेची जोड देत त्यांनी उभा केलेला कार्यप्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.



साप्ताहिक पृथ्वी प्रतिष्ठान

शनिवार २२ ऑगस्ट २०२६



सं पा द की य

# मोल मातीचे

## पाण्यासोबतच माती वाचवा...!

पाणी आणि माती वाचविण्यासाठी सर्वच स्तरावर प्रयत्न सुरु आहेत. यात पाण्याइतकंच महत्व मातीला आहे. सुपीक माती तयार होण्याची प्रक्रिया आपण जाणून घेतल्यास कळेल की माती वाचवणे का आवश्यक आहे आणि माती वाचविण्याचे फायदे कोणते आहे. माती तयार होण्याची प्रक्रिया अतिशय मंद स्वरुपाची असून मोठ्या खडकांच्या उन, वारा, पाऊस यांच्या सततच्या संपर्काने खडकाचे विघटन होत असते प्रत्यक्ष खडक मातीत रुपांतरीत होण्यास हजारो वर्षे लागतात. खडक मातीत रुपांतरीत होण्यास हजारो वर्षे लागतात. आपण शेतात जी माती बघतो ती याच प्रक्रियेतून तयार झालेली असते आणि खडकांमधील सर्व मुलद्रव्ये त्यात असतात आणि त्याच्या गुणवत्तेनुसार मातीचा रंग, कस आणि गुणवत्ता ठरते. खडकांची झीज मातीची सुरुवात असते. खडक दिवसा उन्हामुळे तापतात आणि प्रसरण पावतात आणि रात्री तापमान कमी झाल्यानंतर ते पुन्हा आकुंचन पावतात त्यामुळे खडकांना तडे जाण्याची प्रक्रिया होते. या प्रक्रियेत पावसाचे पाणी जमा झाल्यास याची गती वाढते आणि खडक ठिसुळ होतात त्यानंतर त्याचे विघटन होत माती होण्याची प्रक्रिया अधिक गतीने होत असते. पाण्याने खडक फुटल्यानंतर माती तयार होताना त्या खडकावर जमलेले शैवालजन्य जीवसृष्टीतील घटक ज्यात सुक्ष्मजीव असतात ते हळूहळू खडकाचं रुपांतर मातीत करतात. या सर्व प्रक्रियेदरम्यान मृत वनस्पती आणि प्राणि कुजल्यामुळे काळा सेंद्रीय पदार्थ तयार हो तो याचा हयुम्स म्हणतात या ह्युम्समुळे माती सूपीक बनते. ·
रंग व प्रकार आपल्या राज्यात आणि देशभरात विविध प्रकारच्या खडकांची उपलब्धता आहे. आणि या खडकांच्या आणि त्यातील खनिजांच्या प्रमाणावर मातीचे प्रकार आणि वेगवेगळे रंग आपणास दिसतात आणि यात असणाऱ्या खनिज पदार्थांवर याच्या सुपीकतेमध्ये ही तितकेच वेगळे प्रकार दिसतात. गडद काळा किंवा फिका काळा रंग असणारी माती टायटॅनिफरस मॅग्नाईट या खनिजामुळे प्राप्त होतो. महाराष्ट्रात मुख्यत्वे करुन ज्वालामुखीजन्य खडक अर्थात बेसाल्ट खडक असल्याने राज्यात या प्रकारची माती अधिक आहे. या प्रकारची माती कापूस आणि ऊस उ त्पादनासाठी सकस मानली जाते. तांबडी किंवा लाल रंगाची माती खडकांमध्ये असणाऱ्या लोह अर्थात आयर्न ऑक्साईडमुळे तयार होते. या लोहामुळेच मातीचा रंग हा लाल होतो. लाल रंगाची माती ग्रॅनाईट आणि नीस या खडकांच्या विघटनातून तयार होवे कोकणचा काही भाग आणि पूर्व विदर्भात या स्वरुपाची माती आपणास दिसते. जांभी माती ही विटांसारखी गडद लाल आणि जांभा रंग असल्याने त्याला वेगळी ओळख आहे. अतिपावसाच्या भागांमध्ये खडक आणि माती यातील लोह आणि ॲल्युमिनियम वगळता इतर सर्व प्रकारची खनिजे वाहुन जातात त्यामुळे या मातीचा रंग गडद लाल असते राज्यात तळकोकण अर्थात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हे आणि लगतचा गोवा राज्याचा प्रदेश या ठिकाणी अशी माती आढळते. काजू, आंबा आणि चहाच्या शेतीसाठी ही माती अतिशय उत्तम मानली जाते. गाळाची माती ही देशातील सर्वाधिक सूपीक माती आहे. नद्या पावसाच्या पाण्यासोबत विविध प्रकारचे सेंद्रीय पदार्थ आणि खनिजे वाहून आणतात. यामुळे या मातीचा रंग राखाडी (ग्रे) किंवा पीवळसर असतो. या खेरीज डोंगर उतारावर पावसाचे पाणी वाहून पठाराकडे जाते त्यामुळे डोंगरावरील मातीमधील पाण्याचे प्रमाण वाढल्याने होणाऱ्या प्रक्रियेमुळे तिचा रंग पिवळसर होतो. तुलनेत याची सुपीकता कमी असते. आता मातीचे रंग आणि प्रकार यानुसार शेती होते मात्र पावसाचे प्रमाण वाढल्यास पाण्यासोबत माती वाहुन जाते. ती वाहून गेल्यास जमिनीचा कस कमी होतो. आणि याचा परिणाम शेतीतील उत्पन्नावर होतो. जितकी आर्थिक माती वाहून जाईल तितका सकसपणा कमी होवून अपेक्षित प्रमाणात उत्पादन होत नाही. परिणामी उत्पन्न देखील कमी होते त्यामुळे माती वाहून जाणे अर्थात मृद संधारण आवश्यक ठरते. वृक्षांची मुळे माती धरुन ठेवत असतात अशा ठिकाणी माती वाहुन जाण्याचे प्रमाण अत्यंत कमी असते त्यामुळे वृक्षारोपण हा मृदसंधारणाचा महत्वाचा भाग ठरतो. जितके वृक्षाच्छादन अधिक तितका मातीचा ऱ्हास कमी सोबत वृक्ष पावसाचे पाणी जमिनीत मुरवत असतात त्यामुळे मृदसंधारणासोबतच जलसंधारणाचेही काम होत असते. माती आणि पाणी आपल्या जीवनाचा आधार आहेत त्यामुळे आपण दोन्हीसाठी प्रयत्न करण्याची गरत आहे. राज्यात केवळ 16.5 टक्के क्षेत्र वनाखाली आहे. ते राष्ट्रीय निर्देशांकानुसार किमान 33 टक्के असायला हवे. यातही सर्वाधिक वृक्षाच्छादन गडचिरोली, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात आहे. लातूर जिल्हा 0.18 टक्के, सोलापूर जिल्हा 0.33 टक्के आणि जालना जिल्ह्यात केवळ 0.47 टक्के क्षेत्रावर वृक्षाच्छादन आहे. ज्या ज्या जिल्ह्यात झाडांची संख्या कमी त्या जिल्ह्यात पावसाचे प्रमाण देखील कमी राहते. परिणामी या भागात सातत्याने दुष्काळी स्थिती दिसते. सिंचनातून शेतीला असणाऱ्या मर्यादा लक्षात घेता राज्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यासोबतच माथा ते पायथा पाणलोटाचा विकास आणि इतर उपाय करुन पाणी वाचवायला पाहिजे. आगामी पिढ्यांना संपन्न असं राज्य द्यायचं असेल तर आजच सुरुवात करु जलसंवर्धनाचा संकल्प करु. -

**प्रशांत दैठणकर, 9823199466 -***

# सुजलाम... सुफलाम... भारतासाठी जलसंधारण...!

पाणी अर्थात जल आणि आपल्या जगण्यासाठी अत्यावश्यक असणारा एक घटक म्हणून याला जीवन देखील आपण म्हणतो. प्रत्येकासाठी पाणी आवश्यक आहे. आपण सर्वच जगात विकसित संस्कृतीचा अभ्यास केल्यास आपणांस जाणवतं की, वनांमधून आणि टोळ्यांमधून जगणारा मानव प्राणी ज्यावेळी सामाजिक व्यवस्था उभारणीसह शेती व्यवसायाला लागला, त्यावेळी सर्वांचा अधिवास नद्या आणि पाण्यांचे साठे आणि पाण्यावरच अवलंबून आहे.

मानवी जीवनात पाणी हे प्राण व्यवस्था आहे. तसेच विकासाचा भाग म्हणून आपण इतर क्षेत्रांकडे बघतो. त्यावेळी कृषी सह उद्योग व्यवसासाठी देखील पाण्याचे तितकेच महत्त्व राहिलेले आहे. औद्योगिक क्रांती झाल्यानंतर नव्या उद्योगांमध्ये पाण्याचा वापर अधिक वाढत गेला.

आज विचार करायचा तर पाण्याबाबत प्रथम आकडेवारी बघायला हवी. जगात असणाऱ्या समुद्रांमधील पाणीसाठा एकूण पाणीसाठ्याच्या 97% इतका आहे आणि हे पाणी क्षार युक्त आहे. अर्थात पिण्यायोग्य पाणी नाही. जे 3 टक्के पाणी पिण्यायोग्य म्हणता येईल, अशा स्थितीत आहे. त्यातील 68 ते 70 टक्के पाणी ग्लेशियर अर्थात हिमनग आणि हिमनद्यांच्या स्वरूपात आहे. तर त्यानंतर शिल्लक राहणाऱ्या शुद्ध जलापैकी 30 टक्के पाणी हे भूजल (जमिनीखालील स्तरात) आहे. उर्वरित पाणी पावसाद्वारे जमिनीवर येते आणि नद्या, सरोवरे आणि भूतलावर येते. यात पावसाने पडणारे पाणी नद्यांमध्ये आले तरी त्यावर प्रक्रिया केल्याशिवाय ते जल उपलब्ध होत नाही, ही परिस्थिती आहे.

पृथ्वीची एकूण लोकसंख्या विभिन्न खंडांमध्ये विस्तारलेले आहे. त्या प्रत्येक ठिकाणी पावसाचे प्रमाण वेगवेगळे आहे. अशा स्थिती




सोबत पाण्याची वाढती मागणी आणि उपलब्ध पाणी यांचा समतोल बिघडत असल्याचे आपणास दिसते आणि त्यावर उपाय अर्थात पाणी साठवणे आणि त्याचा योग्य पद्धतीने वापर करणे हाच आहे.

आपला भारत देश त्यातही मौसमी हवामान प्रदेशात आहे, त्यामुळे देशात चार महिन्यात पडणाऱ्या पावसावर 12 महिन्यांचे नियोजन करावे लागते. आपला देश मुख्यत्वेकरून कृषी प्रधान देश आहे आणि हे शेतीचे काम पाण्यावर आधारित असे आहे. पडणारा पाऊस कुठे आणि किती पडेल, याचा अंदाज वर्तवण्याचे तंत्र अवगत झाले असले तरी आपण लहरी अशा निसर्गावर निर्भर आहोत. यामुळे देशात पडणाऱ्या प्रत्येक पाण्याच्या/पावसाच्या थेंबाला आपण वापरणे हा सर्वोत्तम मार्ग आहे.

पाणी अडवणे जमिनीत जिरवून त्याचे साठे निर्माण करणे, तलावांच्या माध्यमातून अधिकाधिक पाणी साठवणे आदी पद्धतीने आपण पाण्याचा अधिक सुयोग्य वापर करू शकतो.

शेतीला लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था शेतीतच असायला हवी. काही दशकांपूर्वी यांत्रिक क्षमता नव्हती, त्यावेळी शेतीत विहीर खोदून त्यातील भूजलावर शेती आपल्या देशात होत होती. परंतु यांत्रिकीकरण झाले आणि आम्ही भूजल साठा गतिमान पद्धतीने उपसा करायला लागलो आणि भूजल पातळीत झपाट्याने घट होत गेली.

नद्यांचे पाणी अडवून धरणे बांधणे पाटांच्या मदतीने शेतीस सिंचन व्यवस्था तयार करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. मात्र ही प्रक्रिया वेळखाऊ आणि खर्चिक अशीच आहे. एका बाजूला आपण धरणं बांधत असतांना, दुसऱ्या बाजूने औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यात देखील झपाट्याने वाढ झाली. या सर्वात पिण्याच्या पाण्यास प्राधान्य असल्याने आधी पेयजल नंतर उद्योग आणि मग कृषी सिंचन या क्रमाने वापर करण्याची वेळ आल्याने धरणं भरली तरी इतर सुविधांच्या आभावी पाण्याचे संकट वाढत आहे. यासाठी आता जलसंधारणाचे महत्त्व देखील तितकेच वाढलेले आहे.

जलसंधारण क्षेत्रात राज्यात मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत. मात्र याला अधिक बळकटी देण्याची गरज आहे. जलसंधारण केवळ याचा पहिला भाग ठरतो. सोबतच अधिक महत्त्व आहे ते मृदसंधारण अर्थात माती टिकवून ठेवणं देखील तितकच महत्त्वाचं ठरतं. ज्यावेळी पावसाचे प्रमाण अधिक असतं, त्यावेळी सुपीक जमीन पाण्यासोबत वाहून जाते. अनेकदा अतिवृष्टीने पाण्यासोबत जमीन खरडून जाते. परिणामस्वरूप जमिनीचा पोत कमी होऊन उत्पादकता कमी होण्यास सुरुवात होते.

जल आणि मृदसंधारण एकत्रित विचार केल्यास आपणास डोंगर माथा ते जमीन असा पाणलोट विस्तार करण्यासोबत शेततळे, पाण्याचे भूगर्भात फेरभरण व्हावे यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग आदी पर्याय आहे.

भविष्यात आपल्या येणाऱ्या पिढीला उत्तम पर्यावरण आणि पाणीपुरवठा सुरळीत राखायचा असेल तर आजच्या पिढीची मोठी जबाबदारी हा महत्त्वाचा संदेश घराघरात आणि मनामनात पोहोचला तरच याबाबतीत सकारात्मक काम होईल आणि तसे सकारात्मक परिणाम, बदल आगामी काळात आपणास दिसतील. मी समाजाचा एक घटक आहे आणि ही माझी जबाबदारी आहे, असे म्हणत प्रत्येक नागरिक यात सहभागी झाला तरच आगामी काळात चांगली स्थिती पुन्हा निर्माण होऊ शकते.

कधी काळी पाण्याचे दुर्भिक्ष्य असणाऱ्या मध्य प्रदेशातील देवास मधील रेनवॉटर हार्वेस्टिंगने जलसंधारणाचा वस्तुपाठ घालून दिलेला आहे तर दुसऱ्या बाजूला लातूर जिल्ह्यात इतर जिल्ह्यातून पाणी आणून पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याची दुर्दैवी वेळ आपण अनुभवलेली आहे.

वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचे हे 150 वे वर्ष आहे. यातील प्रथम ओळींमध्ये सुजलाम, सुफलाम...! शब्दांचा वापर याच अर्थाने आहे. त्यामुळे आताच कामाला लागूया... पडणारा प्रत्येक थेंब जिरावला तर भारत पुन्हा सुजलाम व्हायला वेळ लागणार नाही.

**प्रशांत दैठणकर**
**9823199466**

# जिद्द अन् चिकाटीच्या जोरावर यश निश्चित; 'मीही जि. प. शाळेचाच विद्यार्थी! -- केजचे पी.आय. राहुल सूर्यतळ

## जि. प. शाळा वरपगाव येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त पोलीस निरीक्षक सूर्यतळ यांचे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन

केज दि २०(प्रतिनिधी)
स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वरपगाव येथे केज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक (पी. आय.) श्री. राहुल सूर्यतळ यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. आपल्या प्रेरणादायी भाषणात त्यांनी, "जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आपण आयुष्यात कोणतेही यश प्राप्त करू शकतो. अपयश ही यशाची पहिली पायरी असते; त्यामुळे अपयश आले तरी खचून न जाता जिद्दीने उभे राहून यशाच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे," असा मोलाचा सल्ला दिला.
पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना आपले ध्येय निश्चित करून त्याचा सतत पाठलाग करण्याचे आवाहन केले. "मीसुद्धा जिल्हा परिषदेचाच विद्यार्थी आहे. गुणवत्तापूर्ण आणि सर्वांगीण विकास साध्य करायचा असेल, तर तो जिल्हा परिषद शाळेतच उत्तम प्रकारे होतो," असा सार्थ अभिमान त्यांनी यावेळी व्यक्त केला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक पाटील सर होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून गावच्या प्रथम नागरिक (सरपंच) श्रीमती अमृता कांबळे उपस्थित होत्या. याप्रसंगी पोलीस पाटील श्री. अरुण गालफाडे, सामाजिक कार्यकर्त्या उर्मिलाताई गालफाडे, सर्व पालकवर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.
स्वातंत्र्यदिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर लेझीम, संगीत कवायत व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. तसेच काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांची मने जिंकली.
हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक पाटील यु. डी., सहशिक्षक शिंदे ए. ए., घुले एस. व्ही., एकशिंगे जी. सी. व शामल बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले. पी.आय. सूर्यतळ यांच्या या भेटीमुळे विद्यार्थी व शिक्षकांमध्ये वा उत्साह निर्माण झाला.

# गुन्हे दाखल शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर शिक्षणाधिकाऱ्यांची करडी नजर;

## न्यायालयीन आदेश आणि पोलीस अहवालाशिवाय पगार नाही!

विशेष बातमी/ प्रतिनिधी केज: शासकीय असो वा खाजगी अनुदानित शाळा, मर्डर, लाच लुचपत व फौजदारी सारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये अडकलेल्या शिक्षकांचे वेतन आणि निर्वाह भत्ता यापुढे सहजासहजी निघणार नाही. अशा शिक्षकांच्या वेतनाबाबत जिल्हा परिषद शिक्षण विभाग आणि वेतन पडताळणी पथकाने (Pay Verification Unit) कडक पावले उचलली असून, न्यायालयाचा स्पष्ट आदेश आणि पोलीस ठाण्याचा अधिकृत अहवाल जोडल्याशिवाय वेतन देयक मंजूर न करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. हा नियम जिल्हा परिषदेच्या शाळांसह खाजगी संस्थांच्या शाळांनाही तंतोतंत लागू असणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की,महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ आणि महाराष्ट्र खासगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ (MEPS Act) मधील तरतुदींनुसार, जर एखाद्या शिक्षकावर, मुख्याध्यापकावर किंवा कर्मचाऱ्यावर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल होऊन त्याला ४८ तासांपेक्षा जास्त काळ पोलीस कोठडी झाली असेल, तर त्याला 'गुणोत्तर निलंबन' (Deemed Suspension) मानले जाते.निलंबन काळात शिक्षकाला नियमित वेतन न मिळता केवळ नियमानुसार निर्वाह भत्ता (Subsistence Allowance) दिला जातो. परंतु, अनेक प्रकरणांमध्ये योग्य कागदपत्रांची छाननी न करताच वेतनाची बिले सादर केली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ही कडक भूमिका घेतली आहे. विशेष म्हणजे खाजगी अनुदानित संस्थांच्या शाळांनाही हा नियम बंधनकारक असून, खाजगी अनुदानित शाळांमध्ये अशा प्रकारची प्रकरणी जास्त प्रमाणात आढळून आले आहेत. अनेकदा खाजगी शाळा व्यवस्थापन (Management) आपल्या स्तरावर प्रकरणे मिटवण्याचा प्रयत्न करते किंवा कागदपत्रांची पूर्तता




न करता वेतन बिले पुढे पाठवते. मात्र, खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांचे वेतनही 'शालार्थ आयडी'द्वारे (Shalarth ID) शासकीय तिजोरीतूनच अदा केले जाते. त्यामुळे संस्थाचालकांनी अथवा मुख्याध्यापकांनी पोलीस अहवाल व न्यायालयीन आदेश न जोडता परस्पर बिल सादर केल्यास, शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) आणि वेतन पथक ते बिल थेट फेटाळणार आहे. यापुढे बिले दाखल करताना गुन्ह्यांची संपूर्ण कागदपत्रे विलास सोबत दाखल करणे बंधनकारक करण्यात आले आहे. थोडक्यात, खाजगी संस्थांच्या शिक्षकांनाही या कायदेशीर चौकटीतून सूट मिळालेली नाही, आणि मुख्याध्यापकांना तर नाहीच नाही. वेतनासाठी 'ही' कागदपत्रे आता जोडणे अनिवार्य:--पोलीस अहवाल (Police Status Report): दाखल गुन्ह्याची सध्याची स्थिती (तपास सुरू, चार्जशीट दाखल की इतर) स्पष्ट करणारा पोलीस ठाण्याचा अधिकृत अहवाल. न्यायालयीन आदेश (Court Order): शिक्षकाला मिळालेला जामीन (Bail Order), निलंबनाविरोधात मिळालेली स्थगिती किंवा दोषमुक्तीचा अंतिम निकालपत्र.निलंबन व पुनर्स्थापना आदेश:- सक्षम प्राधिकरणाने (CEO / शाळा व्यवस्थापन) दिलेले अधिकृत पत्र. वेतन पडताळणी अर्ज: वेतन पथकाची पूर्वमंजुरी व छाननी अहवाल. निधीचा गैरवापर रोखण्यासाठी कठोर पाऊल- शासकीय व सार्वजनिक निधीचा गैरवापर रोखणे आणि शैक्षणिक क्षेत्रात पारदर्शकता व शिस्त आणणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी किंवा प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे असलेल्या शिक्षकांचे वेतन रोखून, कागदपत्रांची कायदेशीर सत्यता पडताळल्यानंतरच पुढील कार्यवाही केली जाईल, असे शिक्षण विभागाच्या वर्तुळातून स्पष्ट करण्यात आले आहे.

# सावंतवाडीचे सुपुत्र आणि कवी संतोष चिले यांना 'कवयित्री बहिणाबाई चौधरी राज्यस्तरीय काव्यरत्न पुरस्कार 2026'

**जामनेर / सावंतवाडी:**
सामाजिक बांधिलकी राखून काम करणाऱ्या 'वसुनंदिनी फाउंडेशन, जामनेर' च्या वतीने 'राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार २०२६' अंतर्गत दिला जाणारा मानाचा 'कवयित्री बहिणाबाई चौधरी राज्यस्तरीय काव्यरत्न पुरस्कार २०२६' सिंधुदुर्ग जिल्ह्यातील (ता. सावंतवाडी) येथील साहित्यिक आणि कवी संतोष दत्ताराम चिले यांना जाहीर झाला आहे. महाराष्ट्रामध्ये निर्भीड, सक्षम आणि कार्यक्षमतेने वावरणाऱ्या समाजातील उत्कृष्ट कला, क्रीडा, सामाजिक, राजकीय, पत्रकारिता, शिक्षक, उद्योग, संस्कृती यांसारख्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींच्या कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी फाउंडेशनतर्फे हा सन्मान दिला जातो. संतोष चिले यांनी करत असलेल्या साहित्यातील कार्याचा आढावा घेऊन फाउंडेशनकडून त्यांची या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार वितरण व सन्मान सोहळा २७ सप्टेंबर २०२६ रोजी अल्पबचत भवन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे



आयोजित कार्यक्रमात अदा करण्यात येईल. या भव्य राज्यस्तरीय सोहळ्याचे आयोजन वसुनंदिनी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विद्याधर सोनवणे आणि संस्थापक सचिव माधुरी कुलकर्णी यांनी केले असून, त्यांनीच या पुरस्काराची अधिकृत घोषणा नियुक्तीपत्राद्वारे निवेदन करून कळविले आहे. या महत्त्वपूर्ण यशाबद्दल कवी संतोष चिले यांच्यावर सिंधुदुर्ग जिल्ह्यासह संपूर्ण साहित्य वर्गातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

साप्ताहिक पृथ्वी प्रतिष्ठान
शनिवार २२ ऑगस्ट २०२६



# बीडचे भयनाट्य आणि सुन्न झालेला सामान्य नागरिक!

स्वातंत्र्योत्तर भारतात अजातशत्रू लोकनेत्यांची आणि भगवान बाबांसारख्या संतांची भूमी, सहकाराची, पवित्र राजकारणाची आणि संघर्षाची परंपरा जपणारा जिल्हा अशी ओळख असलेल्या बीड जिल्ह्याला आज नेमकी कोणाची दृष्ट लागली आहे? गेल्या काही महिन्यांपासून बीडमध्ये जे काही घडते आहे, ते पाहता हा कायदा आणि सुव्यवस्थेचा जिल्हा उरला नसून गुंडगिरी, जातीय विद्वेष आणि राजकीय वरदहस्ताने माजलेल्या दहशतीचा आखाडा बनला आहे की काय, असा उद्विग्न प्रश्न प्रत्येक बीडकराच्या मनात निर्माण झाला आहे.

जातीय ध्रुवीकरण आणि राजकीय पोळी-

मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचे केंद्रस्थान बीड आणि मराठवाडा राहिले आहे. हक्काच्या लढ्यासाठी समाज रस्त्यावर उतरला; परंतु या आंदोलनाच्या आड जिल्ह्यात जो भीषण जातीवाद पेरला गेला, त्यामुळे वर्षानुवर्षे गुण्यागोविंदाने राहणाऱ्या मराठा -वंजारा पर्यायाने ओबीसी समाजात दुराव्याची दरी निर्माण झाली असल्याचे चित्र आहे . दुर्दैवाने, सर्वपक्षीय नेत्यांनी हा जातीय तणाव निवळण्याऐवजी आपापल्या व्होट बँकेची गणिते सांभाळण्यासाठी या आगीत तेल ओतण्याचेच काम केले जात असल्याचे दिसत आहे. एकमेकांविरुद्ध पेटवलेल्या या जातीय ध्रुवीकरणाची किंमत आज बीडचा सर्वसामान्य नागरिक मोजत आहे. सर्वसामान्य नागरिक मोठ्या भयानक कष्टाने जीवन जगत असल्याचे दिसत आहे.

वाळू-माफिया, हप्तेखोरी आणि स्थानिक अवैध धंदे--

बीडमधील कायदा आणि सुव्यवस्था बिघडण्यामागे केवळ राजकीय सत्तासंघर्ष कारणीभूत नाही, तर जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात फोफावलेले अवैध धंदे हे या गुन्हेगारीचे मुख्य इंधन ठरत आहेत. गोदावरी आणि मांजरा नदीच्या पात्रातून होणारी अनधिकृत वाळू उपसा-तस्करी, जमीन हडपण्याचे प्रकार (लँड ग्रॅबिंग) आणि शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत चालणारी हप्तेखोरी यामुळे स्थानिक पातळीवर गुंडांची नवी फळी तयार झाली आहे. अवैध धंद्यांच्या ओबीने निर्माण झालेले गुंड प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांना खतम करण्यापर्यंत गेल्याची अनेक उदाहरणे बीड जिल्ह्यात दिसून आलेली आहेत. स्थानिक पोलीस ठाण्यांमधून या माफियांना मिळणारे छुपे अभय आणि राजकीय नेत्यांची भागीदारी यामुळे हे गुन्हेगार आज कोणालाही न घाबरता कायदा हातात घेत आहेत.

सत्तेचा वरदहस्त आणि गुन्हेगारीचे उदात्तीकरण--

जातीवादाचा आणि बेकायदेशीर धंद्यांचा हाच वणवा विझत नाही तोच बीडच्या कायदा-सुव्यवस्थेचे वाभाडे काढणाऱ्या भीषण हत्यांची साखळीच सुरू झाली असल्याचे चित्र बीड जिल्ह्यात दिसत आहे. केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची झालेली निर्घृण हत्या असो वा नुकतीच समोर आलेली विलास घुले यांची हत्या असो—या घटना केवळ वैयक्तिक वैमनस्यातून घडलेल्या नाहीत, तर त्यांना राजकीय सत्तेची, संपत्तीची आणि वशिल्याची उघड फूस असल्याचे सिद्ध होत आहे. विलास घुले हत्या प्रकरणात पुरवणी यादीत थेट खासदारपुत्र सौरभ सोनवणे यांचे नाव समोर येणे, हे बीडमधील ढासळलेल्या राजकीय नैतिकतेचे अत्यंत विदारक चित्र आहे. बीडमध्ये गेल्या काही वर्षांत राजकीय पुढार्यांच्या छत्रछायेखाली गुन्हेगारीचे ज्या प्रकारे उदात्तीकरण झाले आहे, त्याचाच हा भीषण परिणाम आहे. जेव्हा सत्तेच्या सावलीत वाढणारी तरुण पिढी थेट हत्यांसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये संशयित म्हणून समोर येते, तेव्हा सर्वसामान्य माणसाने न्यायाची आणि सुरक्षेची अपेक्षा कोणाकडून करायची?

प्रशासनाचे लाचार आत्मसमर्पण?

आज बीड जिल्ह्यातील परिस्थिती अत्यंत दयनीय आणि चिंताजनक बनली आहे. गल्लीबोळातील गुंडगिरी, राजकीय वरदहस्त असलेले भूमाफिया व वाळूमाफिया, जातीय विष कालवणारे समाजकंटक आणि त्यांना अभय देणारी लाचार यंत्रणा—या चक्रव्यूहात बीडचा सर्वसामान्य नागरिक पिळला जात आहे. रोज सकाळी घराबाहेर पडताना 'आपण सुरक्षित घरी परत येऊ का?' या भीतीच्या सावटाखाली, जीव मुठीत धरून जगावे लागणे हे कोणत्याही लोकशाही व्यवस्थेला काळीमा फासणारे आहे.

पोलीस प्रशासन नक्की कोणासाठी काम करत आहे? गुन्हेगाराला कोणतीही जात नसते आणि त्याला राजकीय पक्ष नसतो, हे तत्त्व कागदावरच राहणार की प्रत्यक्षात उतरणार? जर लोकप्रतिनिधींचे नातेवाईकच गुन्हेगारीच्या यादीत झळकत असतील, तर पोलीस यंत्रणा निष्पक्षपणे तपास करण्याचे धाडस दाखवणार का?

# खुलताबादमध्ये अवैध कत्तलखाने व गॅस रिफिलिंग अड्ड्यावर पोलिसांची धाड; 50 गोवंशीय जनावरांची सुटका, लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त

खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद शहरात गुप्त माहितीच्या आधारे पहाटेची धडक कारवाई खुलताबाद शहरातील कुरेशी मस्जिद व पांगरा तलाव परिसरात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर कत्तलखाने आणि धोकादायक गॅस रिफिलिंगचा व्यवसाय सुरू असल्याची पक्की बातमी मिळताच पोलिसांनी पहाटेच्या सुमारास अचानक छापा टाकला. प्रशिक्षणार्थी सहाय्यक पोलिस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने २० ऑगस्टच्या रात्री उशिरा व पहाटे साडेचारच्या सुमारास ही गुप्त मोहीम राबवून अवैध धंद्यांवर सर्जिकल स्ट्राइक केला. ५० जिवंत गोवंश मुक्त, कत्तलखाना उद्ध्वस्त पोलिस पथकाने कुरेशी यांच्या मालकीच्या गोठ्यांवर मारलेल्या छाप्यात सुमारे ५० जिवंत गोवंशीय जनावरांची सुटका करण्यात यश मिळवले. मात्र, तपासादरम्यान एक जनावर कत्तल केलेल्या अवस्थेत आढळून आले.






कोणत्याही अधिकृत परवानगीशिवाय सुरू असलेले हे अवैध कत्तलखाने पोलिसांनी उद्ध्वस्त करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, जप्त केलेला मुद्देमाल नष्ट करण्याचे काम हाती घेतले आहे.

'मौत का खेळ' थांबवला; गॅस रिफिलिंगचा काळाबाजार उघड. कत्तलखान्यांवरील कारवाई दरम्यानच शहरात अत्यंत धोकादायक पद्धतीने सुरू असलेल्या गॅस रिफिलिंग अड्ड्याचाही पर्दाफाश करण्यात आला. घरगुती गॅस सिलिंडरमधून ऑटोरिक्षा व इतर वाहनांमध्ये अवैधपणे गॅस भरला जात होता. पोलिसांनी या कारवाईत एका ऑटोरिक्षासह १३ घरगुती गॅस सिलिंडर, इलेक्ट्रिक मोटार आणि वजन काटा असा एकूण १ लाख ८४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. एकूण ७ लाख ७० हजारांचा मुद्देमाल जप्त, गुन्हे दाखल या संपूर्ण मोहिमेत पोलिसांनी सुमारे ७ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी खुलताबाद पोलिस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण व सुधारणा अधिनियम, प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम, भारतीय न्याय संहिता आणि जीवनावश्यक वस्तू व सेवा अधिनियमांतर्गत विविध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या धडक कारवाईत कन्नड व खुलताबाद पोलिसांच्या संयुक्त पथकाने सहभाग घेतला होता.

स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह, नागरिकांकडून कौतुक

एका तरुण व कर्तव्यदक्ष महिला अधिकाऱ्याने दाखवलेल्या या धाडसाचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे. मात्र, स्थानिक पोलिसांच्या नाकाखाली गेल्या अनेक दिवसांपासून हे बेकायदेशीर आणि धोकादायक धंदे कसे सुरू होते, असा संताप नागरिक व्यक्त करत आहेत. स्थानिक पोलिसांच्या आशीर्वादानेच हे प्रकार सुरू होते का, असा संशय व्यक्त केला जात असून दोषी कर्मचाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# गायत्री मेवाडमध्ये खाद्यपदार्थांच्या स्वच्छतेचा अभाव; अन्न प्रशासनाची कारवाई.

छत्रपती संभाजीनगर/ शेख फेरोज 'Safe Food, Safe Maharashtra' अभियानांतर्गत अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने क्रांती चौक परिसरातील गायत्री मेवाड प्रायव्हेट लिमिटेड येथे तपासणी केली. या तपासणीदरम्यान खाद्यपदार्थांच्या हाताळणी व साठवणुकीमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्याने ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

तपासणीदरम्यान दुर्गंधीयुक्त पनीर भोजनासाठी ठेवण्यात आलेले, तसेच





स्वच्छतागृहाजवळ भाजीपाला कापण्याचे काम सुरू असल्याचे आढळले. याशिवाय वॉशिंग एरियामध्ये नूडल्स उघड्यावर ठेवण्यात आले होते. खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे खाद्यतेल काळवंडलेल्या अवस्थेत आढळले. तसेच काही मुदतबाह्य खाद्यपदार्थही तपासणीदरम्यान आढळून आले. यापूर्वी संबंधित आस्थापनाला ५० हजार रुपयांचा दंड करण्यात आला होता. तसेच प्रशासनाकडून नोटीस बजावण्यात आली होती. मात्र या नोटीसकडे दुर्लक्ष केल्याचे तपासणीत निदर्शनास आले. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाने संबंधित आस्थापनाविरुद्ध पुढील कारवाई करत सक्त ताकीद दिली आहे.ग्राहकांना सुरक्षित व स्वच्छ खाद्यपदार्थ उपलब्ध करून देणे ही संबंधित आस्थापनाची जबाबदारी आहे.

खाद्यपदार्थांची साठवणूक, स्वच्छता आणि हाताळणी करताना अन्न सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहेत.

# लातूर येथे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी साधला नागरिकांशी संवाद

लातूर, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी शासकीय विश्रामगृहातील सभागृहात आयोजित जनसंवाद कार्यक्रमात नागरिकांची निवेदने स्वीकारली. यावेळी लातूर जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी रस्ते, भूसंपादन, कृषी, उद्योग, भूमापन आणि आरोग्य यांसारख्या विविध विषयांवरील निवेदने सादर केली.



यावेळी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, अहिल्या गाठाळ, गणेश पवार, सायली ठाकूर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जनसंवाद कार्यक्रमात प्राप्त झालेली निवेदने संबंधित कार्यालयांकडे पाठवली जातील. त्यावर तातडीने आवश्यक ती कार्यवाही करून त्याबाबतची माहिती अर्जदार व विभागीय आयुक्त कार्यालयाला सादर करावी. यापुढे दर एक-दोन महिन्यांनी लातूर येथे आढावा बैठक घेऊन या निवेदनांवर झालेल्या कार्यवाहीचा प्रकरणनिहाय आढावा घेतला जाईल, असे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी सांगितले. तसेच प्रत्येक प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्याने केवळ सकारात्मकच नाही, तर गतिशीलतेने काम करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

# शिरसाटवाडीत भैरवनाथ देवस्थान ट्रस्टची नवी कार्यकारिणी; फलकाचे दिमाखात उद्घाटन





**बाळासाहेब खेडकर, पाथर्डी प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील शिरसाटवाडी येथील ग्रामदैवत श्री काल भैरवनाथ देवस्थान ट्रस्टची नवीन कार्यकारिणी जाहीर झाली असून, नूतन कार्यकारिणीच्या फलकाचे उद्घाटन ह.भ.प. काशिनाथ महाराज व माजी सभापती अर्जुनराव शिरसाट यांच्या हस्ते फीत कापून दिमाखात करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी सभापती अर्जुनराव शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली देवस्थान ट्रस्टची नवीन कार्यकारिणी गठित करण्यात आली आहे. देवस्थानच्या धार्मिक परंपरा जपत आगामी काळात देवस्थानच्या विकासाला अधिक चालना देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी नूतन विश्वस्त मंडळावर सोपविण्यात आली आहे.नवीन कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी जनार्दन भानुदास शिरसाट, उपाध्यक्षपदी अनंत राजे कराड, सचिवपदी गोरक्ष महादेव शिरसाट (मेजर), तर खजिनदारपदी भानुदास रामचंद्र शिरसाट यांची निवड करण्यात आली आहे.

तसेच विश्वस्त म्हणून महेंद्र सहदेव शिरसाट, अक्षय अर्जुनराव शिरसाट, डॉ. बाळासाहेब दशरथ शिरसाट, पोपट पांडुरंग शिरसाट, भीमराव छगन शिरसाट, सुधीर पंढरीनाथ महाजन आणि रामनाथ बाबासाहेब खाडे यांची निवड करण्यात आली आहे.

नूतन विश्वस्त मंडळाने देवस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. श्री काल भैरवनाथ देवस्थानचा लौकिक अधिक वृद्धिंगत करण्यासाठी धार्मिक, सामाजिक तसेच विकासात्मक उपक्रम राबविण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करू, असा विश्वास नूतन विश्वस्त मंडळाने व्यक्त केला. नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून देवस्थानच्या कारभाराला अधिक शिस्तबद्ध दिशा मिळण्यासोबतच भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि विकासकामांना गती देण्याचे काम केले जाणार आहे. नूतन कार्यकारिणीकडून देवस्थानच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा ग्रामस्थ व भाविकांनी व्यक्त केली.

दरम्यान, नूतन विश्वस्त मंडळाच्या वतीने ग्रामस्थांचे आभार मानण्यात आले. ग्रामस्थांनी नवनिर्वाचित विश्वस्त मंडळाचे अभिनंदन करून श्री काल भैरवनाथ देवस्थानच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# जलसंधारणाच्या कामात सर्वांनी योगदान देणे आवश्यक- जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड, दि. 21 (जिमाका) :- माती जपा, पाणी वाचवा आणि सुरक्षित महाराष्ट्र घडवा या संदेशाचा प्रसार करण्यासाठी बीड जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी सुपीक जमीन आणि पाण्याची शाश्वत व्यवस्था निर्माण करण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी जलसंधारणाच्या कामात सक्रिय योगदान देणे आता काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

जिल्हा पोलिस मुख्यालयाच्या मैदानावरुन महा वॉकेथॉनला हिंरवी झेंडी दाखवून प्रारंभ करण्यात आला. यावेळी जलसंधारणचे कार्यकारी अभियंता सुरज लब्बा, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी प्रशांत देशमुख, जलमित्र संजय शिंदे, जलमित्र अभिमान अवचार यांची प्रमुख उपस्थिती होती.



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल असून जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. अल निनोमुळे मान्सूनची प्रणाली कमकुवत झाल्याने भूजल पातळी खालावली आहे. त्यामुळे निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आणि महाराष्ट्राला पाण्याच्या संकटापासून सुरक्षित ठेवण्यासाठी केवळ शासकीय पातळीवर नव्हे, तर लोकसहभागातून जलसंधारणाची चळवळ उभी राहणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी अडविण्यासोबतच त्याचा काटकसरीने वापर करण्याचा संकल्प आजच्या दिवशी करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

महा वॉकेथॉनच्या सुरुवातीस उपस्थित सर्वांना माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारणातील उल्लेखनीय कामाचा आदर्श घेत त्यांची जयंती 21 ऑगस्ट हा जलसंधारण दिन म्हणुन साजरा करण्यात येत असून यावेळी जलसंधारणाची शपथ देण्यात आली. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांनी जलसंधारणाच्या क्षेत्रात ऐतिहासिक आणि क्रांतीकारी पावले उचलली होती. त्यांनी सुरू केलेले जलसंधारणाचे काम आजही राज्यासाठी दीपस्तंभ ठरत आहे. महा वॉकेथॉनच्या माध्यमातून आरोग्याचा संदेश देत असतानाच, राज्यापुढील पाण्याचे संकट दूर करण्यासाठी प्रत्येकाने पाण्याचा थेंब अन् थेंब वाचवला पाहिजे आणि जिरवला पाहिजे, हा संदेश या शपथविधीतून देण्यात आला.

महा वॉकेथॉन -वॉक फॉर वॉटर या रॅलीला पोलिस मुख्यालयाच्या मैदानावरुन प्रारंभ करण्यात आला त्यानंतर ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे क्रीडा संकुलात जावून समारोप करण्यात आला. समारोप प्रसंगी सहभाग घेतलेल्यांना प्रमाणपत्राचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी शालेय विद्यार्थी, क्रीडा प्रेमी, नागरिक व संबंधित यंत्रणेचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागपूर उच्च न्यायालय अन् SIT च्या धसक्याने शिक्षण क्षेत्रात 'भूकंप': बीडसह संपूर्ण महाराष्ट्रात 'बोगस शालार्थ आयडी' घोटाळ्याची पाळेमुळे खोल!

## कोट्यवधींचा 'टेबल मनी', बनावट मान्यतेचा महाघोटाळा; व्हीव्हीआयपी, राजकीय नेते अन् बड्या संस्थाचालकांचे धाबे दणाणले

**उच्च न्यायालयाचे कडक निर्देश: "राजकीय वजन किंवा व्हीव्हीआयपींचा वरदहस्त असला तरी एकही संस्था चौकशीतून सुटणार नाही"**

### बीडच्या शिक्षणाधिकारी किरण कुवर यांचा जामीन फेटाळला; दलाल प्रशांत वाडिलेच्या व्हॉट्सॲप चॅटने उघड केली साखळी

बीड/छत्रपती संभाजीनगर:बीड जिल्ह्यातील शिक्षण विभागासह संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या १५० ते १६० कोटी रुपयांच्या बनावट 'शालार्थ आयडी' आणि बोगस शिक्षक भरती घोटाळ्याचा पर्दाफाश झाल्यानंतर आता शिक्षण वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. या महाघोटाळ्याची पाळेमुळे मुळापासून उपटून काढण्यासाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाला (SIT) ऑगस्ट २०२६ च्या एन्ड पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, त्यातच मुंबई उच्च न्यायालयानच्या नागपूर/छत्रपती संभाजीनगर खंडपीठ ने या चौकशीचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रात करण्याचे थेट आदेश दिल्याने प्रस्तुत शिक्षण महाघोटाळ्यात सामील असलेल्या प्रतिष्ठित आणि राजकीय छत्राखालील बड्या संस्थाचालकांचे आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.१. उच्च न्यायालयाचा दणका: राजकीय नेते आणि 'व्हीव्हीआयपी' संस्थाही रडारवर-- मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या डबल बेंच खंडपीठाने एसआयटीला स्पष्ट निर्देश दिले आहेत की, चौकशीचा रोख केवळ एका भागापुरता मर्यादित न ठेवता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांची सखोल चौकशी व्हावी आणि सदरची चौकशी निष्पक्ष आणि पारदर्शकतेने व्हावी. चौकशीत कुठलाही पक्षपात झाला नाही पाहिजे, लोकप्रतिनिधी किंवा अति-महत्त्वाच्या (VVIP) व्यक्तींद्वारे चालवल्या जाणाऱ्या संस्थांचाही यात समावेश असेल. संस्था कोणाची आहे यापेक्षा तेथे गैरव्यवहार झाला आहे का, याला प्राधान्य दिले जाईल.

चौकशीचा विस्तार: नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, लातूर, नागपूर आणि मुंबईसह अनेक जिल्ह्यांमधील संस्थांची चौकशी पथकाने सुरू केली आहे. करदात्यांच्या पैशांची मोठ्या प्रमाणात उधळपट्टी: वेतन अनुदान हा करदात्यांचा पैसा आहे आणि अशा बेकायदेशीर कृत्यामुळे शासनाचे कोट्यावधींचे नुकसान झालेले आहे , त्यामुळे बेकायदेशीर नियुक्त्यांमुळे राज्याचे झालेले आर्थिक नुकसान खपवून घेतले जाणार नाही, असे न्यायालयाने कडक शब्दात बजावले आहे.

### बीड शिक्षणाधिकारी किरण कुवर यांचा जामीन फेटाळला

२. बीड शिक्षण विभागातील योजनेच्या तत्कालीन शिक्षणाधिकारी किरण जयप्रकाश कुवर यांचा अटकपूर्व जामीन अर्ज नाशिकच्या सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. कुवर यांच्या कालावधीत बनावट आदेश आणि मागील तारखांच्या (बॅकडेटेड) मान्यतेच्या आधारे शेकडो बोगस शालार्थ आयडी तयार करण्यात आल्याचा गंभीर ठपका आहे. न्यायालयीन धक्का बसल्याने त्यांच्यावर कोणत्याही क्षणी अटकेची कारवाई होण्याची शक्यता आहे. अटक होण्याच्या भीतीने त्या बीडच्या कार्यालयात फिरकलेल्या देखील नाहीत.३. दलालाच्या मोबाईल डेटाने पोलखोल; भाजप पदाधिकारी संजय गरुड अटकेत-- नाशिक आर्थिक गुन्हे शाखेने धुळ्यातील मुख्य सूत्रधार प्रशांत वाडिले याला बेड्या ठोकल्यानंतर त्याच्या डिजिटल डिव्हाईस आणि व्हॉट्सॲप चॅटमधून धक्कादायक माहिती समोर आली आहे. वाडिलेच्या चौकशीवरून पोलिसांनी सोलापूर येथील फार्महाऊसमधून घोटाळ्यातील बडा सूत्रधार व भाजप पदाधिकारी संस्थाचालक संजय गरुड याला ताब्यात घेतले. या दलाल-अधिकारी-संस्थाचालक साखळीने बीड, लातूर, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांत आपले जाळे पसरवले होते. वाढिलेच्या गैर कृत्याचा आणि संस्थाचालकांशी संगणमतेचा प्रकार समोर आल्याची जिल्ह्यात चर्चा आहे.




### ४. एका शालार्थ आयडीसाठी ४.५ ते १० लाखांचा रेट!

तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, २०१२ ते २०१९ दरम्यान शिक्षक भरतीवर बंदी असतानाही, बीड जिल्ह्यातील केज, गेवराई, अंबाजोगाई व बीड परिसरातील काही खासगी शिक्षण संस्थांमध्ये बोगस पटसंख्या व मागील तारखांची नियुक्ती पत्रे दाखवून एका-एका शालार्थ आयडीसाठी तब्बल ४.५ लाख ते १० लाख रुपयांपर्यंतची लाच उकळण्यात आली. या प्रकारात बीडचे तत्कालीन माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांचा मोठा सहभाग असल्याची चर्चा आहे.

५. १०,०६० शालार्थ आयडी स्कॅनरखाली--
पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या नेतृत्वाखालील SIT पथक सध्या छत्रपती संभाजीनगर शिक्षण उपसंचालक कार्यालयांतर्गत २०१९ ते २०२४ या काळात मंजूर झालेल्या १०,०६० शालार्थ आयडींची बारकाईने तपासणी करत आहे. यापूर्वी फेरफार करण्याचे प्रयत्न उघड झाल्यानंतर बीडचे प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी व लातूरचे नागनाथ शिंदे यांना निलंबित करण्यात आले आहे.

६. न्यायालयाचे एसआयटीला सतर्कतेचे आदेश
ठोस पुराव्यांवरच कारवाई: न्यायालयाने एसआयटीला स्पष्ट केले आहे की, केवळ अफवा किंवा निराधार आरोपांवर आधारित कारवाई करू नये.
खोट्या तक्रारींवर कारवाई: तक्रारदारांना प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल आणि माहिती खोटी आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याचे स्वातंत्र्य एसआयटीला असेल.
पुढील सुनावणी: एसआयटीला प्रगती अहवाल सादर करण्याचे आदेश देऊन न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २४ सप्टेंबर रोजी ठेवली आहे.

बीडमधील 'बडे साहेब' अन् संस्थाचालक 'नॉट रिचेबल' SIT आणि पोलीस कारवाईच्या धसक्याने बीड जिल्ह्यातील अनेक नामांकित संस्थाचालकांनी वकिलामार्फत उच्च न्यायालय व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी धावपळ सुरू केली आहे, तर काही संस्थाचालक अचानक 'नॉट रिचेबल' झाले आहेत. एसआयटीचा अंतिम अहवाल सादर होताच बोगस शिक्षकांचे वेतन कायमचे रोखून, संबंधित संस्थांवर 'मोक्का' आणि आर्थिक गुन्ह्यांतर्गत कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट संकेत प्रशासनाने दिले आहेत.

# पत्रकार सुशील थोरात यांच्यावरील हल्ल्याचा खर्डा प्रेस क्लबकडून तीव्र निषेध




खर्डा ( प्रतिनिधी ) : प्रा. महेश बजगुडे

साम टीव्हीचे अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी पत्रकार सुशील थोरात यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा खर्डा प्रेस क्लबच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या घटनेप्रकरणी हल्लेखोरांचा शोध घेऊन त्यांच्यावर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

याबाबत खर्डा प्रेस क्लबच्या वतीने सहायक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत, खर्डा पोलीस ठाणे, यांना निवेदन देण्यात आले. पत्रकार हे लोकशाहीचा महत्त्वाचा आधारस्तंभ असून समाजातील विविध प्रश्न आणि सत्य परिस्थिती जनतेसमोर मांडण्याचे कार्य करतात. त्यामुळे पत्रकारांवरील हल्ले, धमक्या आणि दडपशाहीच्या घटना गांभीर्याने घेणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

सुशील थोरात यांच्यावरील हल्ल्याची सखोल चौकशी करून संबंधित आरोपींचा शोध घ्यावा आणि त्यांच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रेस क्लबच्या वतीने करण्यात आली. तसेच भविष्यात पत्रकारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

निवेदनावर खर्डा प्रेस क्लबचे अध्यक्ष संतोष ज्ञानेश्वर थोरात, दत्तराज पवार, अनिल धोत्रे, प्रा. महेश बजगुडे, बाळासाहेब शिंदे, किशोर दूशी आणि धनसिंग साळुंके यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बीडच्या कविता गित्ते आणि नाशिकच्या कुंदा बच्छाव यांना प्रतिष्ठित 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार 2026' जाहीर!

**नवी दिल्ली / बीड / नाशिक ( प्रतिनिधी ):** शालेय शिक्षण आणि साक्षरता क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाची दखल घेत केंद्र सरकारने 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६' ची अधिकृत घोषणा केली आहे. Press Trust of India (PTI) ने दिलेल्या वृत्तानुसार, देशभरातून निवड झालेल्या ४८ आदर्श शिक्षकांमध्ये महाराष्ट्रातील दोन महिला शिक्षिकांनी बाजी मारली आहे. बीड जिल्ह्यातील केज येथील शिक्षिका कविता गित्ते आणि नाशिक महानगरपालिकेच्या शिक्षिका कुंदा बच्छाव यांचा यात समावेश आहे. येत्या ५ सप्टेंबर रोजी 'शिक्षक दिना'चे औचित्य साधून नवी दिल्लीत भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी बनल्या 'ज्ञानदूत': कविता गित्ते बीड जिल्हयातील केज येथील 'बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ' संचलित साने गुरुजी निवासी विद्यालयात कविता गित्ते कार्यरत आहेत. ऊसतोड कामगारांच्या पाल्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांच्या जीवनाला नवी दिशा देण्याचे अत्यंत आव्हानात्मक कार्य त्यांनी पार पाडले आहे. त्यांच्या या सामाजिक आणि शैक्षणिक योगदानाबद्दल राष्ट्रीय स्तरावर त्यांचा गौरव होत आहे.


कविता गित्ते कुंदा बच्छाव

नाविन्यपूर्ण उपक्रमांची भरारी: कुंदा बच्छाव नाशिक महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक १८ (आनंदवली) येथील सहाय्यक शिक्षिका कुंदा बच्छाव यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी सातत्याने नवनवीन उपक्रम राबवले आहेत. विद्यार्थ्यांसाठी 'तरंग' वाचनालय सुरू करणे. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि 'मिश्रण मोबाईल फ्री' मोहीम. 'ज्ञानाच्या भिंती' सारख्या नाविन्यपूर्ण संकल्पना राबवणे. त्यांच्या या कार्याची दखल याआधी महाराष्ट्र शासनाने घेत २०२३ मध्ये त्यांना 'क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार' देऊन सन्मानित केले होते. आता थेट राष्ट्रीय स्तरावर त्यांच्या नावावर मोहर उमटली आहे. देशभरातून ४८ शिक्षकांची निवड केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, देशभरातील विविध राज्ये, केंद्रशासित प्रदेश, केंद्रीय विद्यालय संघटना (KVS), नवोदय विद्यालय समिती (NVS), सैनिक स्कूल आणि पीएम श्री (PM SHRI) शाळांमधून शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या या दोन रणरागिणींनी मिळवलेल्या या उत्तुंग यशामुळे बीड आणि नाशिक जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

Printed and published by Shivdas Marotirao Munde (Editor & Publisher) on behalf of owner "Pruthvi Pratishthan". Printed at Magic Publication, Shop No. 10, Manpa Shopping Complex, Gandhi Chowk, Latur, and published from office of Pruthvi Pratishthan, 'Shivshakti', Opp. Court, Police Line, Phule Nagar, kaij, dist. Beed. Editor: Shivdas Marotirao Munde. Reg. No.: MHMAR/26/A4676. (Subject to kaij dist. Beed Court Jurisdiction).

पृथ्वी प्रतिष्ठानच्या मालकीचे हे पत्र प्रकाशक व संपादक शिवदास मारोतीराव मुंडे यांनी मुद्रक मॅजिक पब्लिकेशन, शॉप क्र. 10, मनपा शॉपिंग कॉम्प्लेक्स, गांधी चौक लातूर येथे छापून, कार्यालय, पृथ्वी प्रतिष्ठान, शिवशक्ती, न्यायालयासमोर, पोलीस लाईन, फुलेनगर, केज जि. बीड येथून प्रकाशित केले. संपादक- शिवदास मारोतीराव मुंडे. रजिस्ट्रेशन क्रमांक MHMAR/26/A4676. ( सर्व वाद केज जिल्हा बीड न्यायालयाच्या अंतर्गत)